RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 July, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 July, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : पंधरा | अंक : पहिला | जुलै २०१७

मैनूं पुच्छण आण सहेलियां (भजन) 4

दु:खं (सत्संग) 7

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 21

अमृतवेळ (ध्यान-अभ्यासापूर्वी दिलेला संदेश) 27

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

मैनूं पुच्छण आण सहेलियां

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे महाराज कृपालजींच्या स्मरणात रचलेले एक भक्तीभावात्मक भजन

१. मैनूं पुच्छण आण सहेलियां, नीं तूं कीवें होई बीमार,
तूं रोवे धाहां मार के, तैनूं चढ़या रहे बुखार,

(माझी विचारपुस करण्यासाठी माझ्या मैत्रिणी आल्या की तू कशी आजारी झालीस? तू छाती पिटून का रडत आहेस? तुला सारखा ताप का चढलेला असतो?)

२. तूं अकदी-थकदी नां कदी, ते करदी नहीं आराम,
तैनूं सुत्तयां कदी नां वेखया, तेरी होई नींद हराम,

(तू कधी आळस देत नाहीस किंवा थकत नाहीस, तू कधी आराम करीत नाहीस. तुला कधी झोपलेले पाहिले नाही. तुझी झोप का उडालेली आहे?)

३. तेरे मुख ते खुशी नां दिस्स दी, तूं ते रहंदी सदा लाचार,
तैनूं हसदेयां कदी नां वेखया, तेरा कीदे नाल प्यार,

(तुझ्या चेहऱ्यावर खूषी दिसत नाही, तू सदैव अगतिक दिसतेस, तुला कधीच हसताना पाहिले नाही. तुझे कोणाशी प्रेम जडलेले आहे?)

४. असीं हत्थ बन करिऐ बेनती, साथों रखीं ना भेद छुपा,
जरा दु:खड़े दस्सीं खोल के, सारा देवीं हाल सुना,

(आम्ही हात जोडून तुझ्याकडे विनंती करतो, तू आमच्याकडून काही लपवून ठेवू नकोस. तुझे दु:खं मला मन मोकळेपणाने सांग, तुझी हृदयावस्था मला सांग.)

५. मेरे जागे भाग सुलखणें, मैनूं मिलया पति जमाल,
मैनूं रूलदी-फिरदी वेख के, दित्ता उच्चा तख्त संभाल,

(माझा भाग्योदय झाला आणि मला सौंदर्यवान व तेजस्वी पती लाभला. मला रडत-रडत फिरत असता त्यांनी पाहिले आणि मला त्यांनी उच्च स्थान बहाल केले.)

६. मैं ओहदी होई सहेलियो, मेरा हरदम रखे ख्याल,
ओह मेरे घर विच आ गया, ओहदा नाम सन्त कृपाल,

(मैत्रिणींनो, मी त्यांचीच होऊन गेले, ते माझी सदैव काळजी घेतात, माझे रक्षण करतात. ते स्वत:हून माझ्या घरी आले, त्यांचे नाव संत कृपाल आहे.)

७. अजे सद्धरा ना मेरियां लत्थियां, मेरा लुटया गया सुहाग,
ओह मैनूं चिट्टी चादर दे गया, किते लग्ग ना जाऐ दाग,

(अजुन माझा शृंगार उतरलेला देखील नव्हता आणि माझे सौभाग्य उजाडले. जाताना ते मला शुभ्र सफेद चादर देऊन गेले व म्हणाले की बघ! यास डाग लागता कामा नये.)

८. हुक्म उसदा मनण वास्ते, मैं अंदर वड़ गई आप,
ओहदी दस्सी जुगत ना भुल्ल दी, मैं हरदम कर दी जाप,

(त्यांच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी मी अंतर्मुख झाले. त्यांनी शिकविलेली नामाची युक्ती मी कधीच विसरू शकणार नाही, मी त्या नामाचा सदैव जप करते.)

९. मैनूं वचन ओहदे पऐ मनणे, मेरे उत्ते जो लाया ला,
मैं सत्–सत् करने मन्न लऐ, दित्ता चरणी शीश झुका,

(मला त्यांचा अध्यात्मिक प्रचार करण्याचा व जीवांचा उद्धार करण्याचा हुकूम मानणे भाग पडले. त्यांनी माझ्यावर काही नियम लागू केले. मी सत्यवचन म्हणून ते मान्य केले आणि आपले मस्तक त्यांच्या चरणी झुकविले.)

१०.मैनूं चरनां विच बिठा के, कीते सतपुरुष ने वाक,
तूं जग दिया आसां छड के, रखीं इक सतगुरू दी आस,

(मला चरणांपाशी बसवून साक्षात सत्पुरूषाने दिलेला तो हुकूम होता की बाह्यजगातील गोष्टींची तू आशा सोडून केवळ एक सतगुरूंची आशा हृदयात बाळग.)

११.तेरे विचों ओण सुगधियां, टप्प जाण समुन्द्रां तों पार,
तैं विच असमानां दे उडणां, तैनूं करन परियां नमस्कार,

(त्यांनी वर दिला की तुझ्यातून सुगंध येईल व तो सातही समुद्र पार जाऊन दरवळेल. तुला विमानातून उड्डाण करून नेले जाईल आणि पऱ्या देखील तुला नमस्कार करतील.)

१२.दिन आजज हो के कटणें, नीवें हो रहणा संसार,
तेरी सतगुरू रखया करेगा, जीवां दा करीं उद्धार,

(इतकी प्राप्ती झाली तरी तू उरलेले आयुष्यसुद्धा नम्रतेने व्यतीत कर आणि संसारात विनम्रतेने रहा, तुझे रक्षण सतगुरू करतील. तू जीवांचा उद्धार कर.)

१३.करे अर्ज 'अजायब' हत्थ जोड़ के, जागे भाग होऐ सतगुरु दयाल,
करां लख शुक्राने ओस दे, मैनूं मिल गए गुरु कृपाल

(अजायब हात जोडून विनंती करीत म्हणतो की सतगुरूंनी दया केल्याने माझे भाग्य उदयास आले. मी परमेश्वराचे लक्षावधी आभार मानतो की मला गुरू कृपाल लाभले.)

***

दु:खं

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू अर्जुनदेवजी महाराजांची वाणी
लेक्सिंग्टन, वर्जीनिया - १ जुलै, १९८०

मात गरभ दुख सागरो पिआरे तह अपणा नामु जपाइआ।।

ही वाणी श्री गुरू अर्जुनदेवजी महाराजांची आहे. परमात्म्याचे प्रिय संत-महात्मा या जगात सदैव येत आलेले आहेत आणि यापुढेदेखील येत राहतील. त्यांचा मार्ग ना कधी बंद झालेला आहे व ना कधी बंद होऊ शकेल. आजच्या युगातील एखाद्या लहान मुलास आई-वडिलांची जितकी गरज असते तितकीच गरज पूर्वीच्या काळी होऊन गेलेल्या मुलासही होती तसेच भविष्यात जन्मास येणाऱ्या मुलासही असेल. आई-वडिलांखेरीज मुल जन्मास येऊ शकत नाही त्याचे कोणी पालनपोषण करू शकत नाही व त्यास ज्ञानही देऊ शकत नाही.

त्याचप्रमाणे संत-महात्मांखेरीज कोणीही आपणांस परमात्म्याकडे घेऊन जाऊ शकत नाही, त्याचे स्थान आपणांस दर्शवू शकत नाही. संतांखेरीज आपणांस कोणीही हे सांगू शकत नाही की कोणते काम आपल्या हिताचे आहे आणि कोणते काम आपल्या हिताविरुद्ध आहे? आपला परमात्म्यापासून विरह का झाला व आपण परमात्म्याची भेट कशी घेऊ शकतो? परमात्म्याचे प्रिय संत-महात्मा आपणांस समजावून सांगतात की आपण कोणत्याही योनीत जन्म घेतला तरी मातेच्या गर्भात असताना आपणांस किती भयंकर दु:खं आणि कष्ट भोगावे लागतात!

मनुष्य स्वत:च्या निवासासाठी मोठ्यात-मोठे घर बांधतो व त्यात सर्व प्रकारच्या ऐशो-आरामासाठी फर्निचर व इतर सुखसोयींची व्यवस्था करतो. कधी आपण त्या घटकेविषयी विचार केला आहे जेव्हा आपण या सर्व सुखसोयी सोडून येथून निघून जाऊ? जरी आपण जाण्यासाठी तयार नसलो तरीही एक अशी शक्ती आहे जी आपणांस या घरातच काय तर या देहातही सदैव राहू देणार नाही. मृत्युपश्चात आपणांस कबरीत दफन केले

जाईल. तेथे कोणत्या सुखसोयी असतील? कबरीत मृतदेहाचे मांस किडे खातात व कालांतराने हाडेही नष्ट होतात. तेथे आपण जिवंत अवस्थेत कुठे असतो की जेणेकरून आपण किड्यांना मांस खाण्यापासून रोखू शकू?

तसेच कबरीपेक्षा जास्त दु:खदायी जागा ही आईच्या गर्भातील मुलाची असते. तेथे असताना आपल्या अंतरात आत्मा असतो म्हणून आपण सुखं-दु:खं अनुभूत करू शकतो. अनेकदा आईच्या पोटात असलेले मुल आजारी पडते, तेथे आपण त्यास कोणते औषध देऊ शकतो? कित्येकदा मुल आईच्या पोटात मृत्यु पावते. तेथे किती कष्ट आणि दु:खं असतात! आजच्या आधुनिक युगात मुल आईच्या पोटात असताना गर्भपातदेखील केला जातो.

विचार करून पहा! जर आपण अशा कठीण जागी असू व बाह्यजगात येण्याची आतुरतेने वाट पाहत असू परंतु कोणीतरी आपणांस असे औषध दिले की आपला तेथेच मृत्यु झाला तर काय हे दु:खं नाही?

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात, आईच्या पोटात असताना समुद्राहून मोठी दु:खं असतात. जेव्हा आपण बाहेर येतो तेव्हादेखील आपणांस दु:खं आणि अडचणींना सामोरे जावे लागते, आपले जीवन संघर्षमय असते. आईच्या पोटात असताना आपण त्या शब्दाशी जोडले गेलेलो असतो आणि त्या शब्दाच्या आधारेच आपला समय व्यतीत करीत असतो. तेथे आपण श्वासा-श्वासाला परमात्म्यापुढे विनंती करीत असतो की हे परमात्मा, तू माझी या अंधाऱ्या कोठडीतून सुटका कर, मी माझ्या कमाईचा व वेळेचा दशांश हिस्सा तुला अर्पण करेन, तुझ्या नामाचा जप करेन, परंतु जेव्हा बाह्यजगातील हवा-पाणी मिळते तेव्हा तो मनुष्य म्हणतो की,''जन्म-मृत्यु नसतोच मुळी. माझ्यासाठी मृत्यु नाही, कदाचित मृत्यु इतरांसाठी आहे.''

गुरू अर्जुनदेवजी महाराज परमात्म्यापुढे विनंती करतात की, हे परमात्मा, आईच्या गर्भात जीव जी दु:खं भोगतो ती समुद्रापेक्षाही मोठी आहेत. परंतु तू आम्हांस तेथे नामाचा आधार दिलास व नामच्या आधारे तेथे ठेवलेस. जेव्हा

आम्ही बाहेर आलो तेव्हा आमच्यावर मायेचा इतका परिणाम झाला की आम्हांस तुझा विसर पडला, आम्ही तुझे स्मरण करीत नाही, आम्हांस असे वाटते की संपूर्ण जगातील धन–संपत्ती इतरांना न मिळता फक्त माझ्या घरी यावी. परंतु आमचा अनुभव असा आहे की आपण जितकी जास्त माया गोळा करतो तितकीच जास्त आपली शांती भंग करून घेतो.

बाहरि काढि बिखु पसरीआ पिआरे माइआ मोहु वधाइआ।।
जिसनो कीतो करमु आपि पिआरे तिसु पुरा गुरु मिलाइआ।।

आता गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात,''ज्यांच्यावर परमात्मा कृपावंत होतो, दयेचा वर्षाव करतो आणि ज्यांना या मृत्युलोकातून मुक्ती देऊ इच्छितो, त्यांना सर्वप्रथम संतांच्या शरणी आणतो. जेव्हा आभाळात ढग दाटून येतात तेव्हा आपण सर्व आशा करतो की पर्जन्यवृष्टी जरूर व्हावी. त्याचप्रमाणे जेव्हा आपण संत–महात्म्यांच्या शरणी येतो तेव्हा आपली खात्री पटते की आपण परमात्म्याच्या निकट आलेलो आहोत.''

सो आराधे सासि सासि पिआरे राम नाम लिव लाइआ।।

संत–महात्मा एखादा नवीन समाज स्थापित करण्यासाठी येत नाहीत तसेच अगोदर अस्थित्वात असलेल्या एखाद्या समाजास नष्ट करण्याचा त्यांचा हेतु नसतो. महात्मा आपणांस शब्द–नामाशी जोडतात. नामस्मरणाद्वारे आपले मन आणि आत्मा एकाग्र होतात. ध्यान–अभ्यासामुळे ते एकाग्रचित्त होऊ लागतात आणि आत्मा शब्दावर स्वार होऊन आपल्या घरी पोहचतो.

संत महात्मा आपणांस सांगतात,''तुम्ही प्रत्येक श्वासासोबत उठता–बसता, जागृतावस्थेत–निद्रावस्थेत नामस्मरण करा. आपणांस जगातील कोणत्याही कामात यशस्वी होण्यासाठी मेहनत आणि हिंम्मतीची गरज असते. मनुष्यास खरे सुख, खरा आनंद नामासोबत जोडून अंतर्यात जाऊनच लाभते. काय कधी आपण मेहनत केली? काय आळस दूर करून पाहिला?

मनि तनि तेरी टेक है पिआरे मनि तनि तेरी टेक।।
तुधु बिनु अवरू न करनहारू पिआरे अंतरजामी एक।।

ज्यांच्या अंतरात विरहाग्नी असतो ते नाम घेऊन आपल्या सतगुरूंवर खरी श्रद्धा, खरा विश्वास ठेवून अत्यंत चिकाटीने नामाची कमाई करतात.

कोटि जनम भ्रमि आइआ पिआरे अनिक जोनि दुखु पाइ।।

आता गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात, ''हे परमात्मा, आमचा तुझ्यापासून विरह झाल्यानंतर आम्ही एकच नव्हे तर करोडो जन्म घेतले. जिथे जाऊन जन्म घेतला तिथे दु:खंच मिळाली, पशुंच्या योनीत गेलो तरी दु:खी झालो, पक्ष्याच्या योनीत गेलो तरी दु:खी झालो. सापाच्या योनीत पोटावर भार देऊन सरपटावे लागले तेव्हा देखील दु:खी झालो. मनुष्य योनीस सर्व योनींमधील प्रधान योनी म्हटले जाते, तरी त्यातही दु:खीच झालो. मनुष्य योनी प्राप्त करूनही अशी अवस्था आहे की अन्नासाठी दु:खी होऊन दारोदारी फिरावे लागते. लग्न झाले नाही तरी दु:खी आणि लग्न झाल्यावर नवरा-बायकोमध्ये अविश्वास निर्माण झाल्यासही दु:खी होतो. एखादा आजार आला वा डोक्यावर कर्जाचे ओझे आल्यासदेखील दु:खी होतो. आपण जितकी सुखं भोगत असतो ती सर्व तात्पुरती असतात, आपणांस कल्पना नसते की कधी आपल्यावर आजारपणाचे दु:खं कोसळेल आणि कधी आपल्या सुखांचे दु:खांमध्ये रुपांतर होईल?''

साचा साहिबु विसरिआ पिआरे बहुती मिलै सजाइ।।

आता गुरू साहेब सांगतात,''आपण प्रत्येक जन्मात अडीअडचणी आणि दु:खं सोसत का आलो आहोत? कारण आपण परमात्म्यास विसरलो. आपले खरे घर सचखंड आहे, आपण त्यास विसरलो आहोत. आपला आत्मा शब्द-नामापासून दूरावून स्वत:चे अस्तित्वच विसरलेला आहे.

जिन भेटै पूरा सतिगुरु पिआरे सो लागे साचै नाई।।

आता गुरू साहेब सांगतात,''ज्यांना परिपूर्ण गुरू लाभतात त्यांना ते खऱ्या नामाचे दान देतात. आपण त्या खऱ्या नामाची साधना करून सतगुरूंच्या कृपेने आपल्या घरी परत सचखंडात जाऊ शकतो. त्यासाठी आपणांस आपली जात वा धर्म बदलण्याची गरज नसते.'' गुरू नानकदेवजी सांगतात:

गुरु जिन्हां का अंधला सिख भी अंधे कर्म करेण।
ओह चलण भाणे आपणे नित झूठो झूठ बुलेण।।

तुम्ही महात्म्यांचे जीवनचरित्र वाचून पहा! गुरू नानकदेवजींनी अकरा वर्षे नामाची खूप कष्टदायक तपश्चर्या केली, कडक दगड-वीटांचा बिछाना बनवून त्यावर निजले. कबीर साहेबांनी जीवनभर सात्विक खिचडीचा आहार केला, नामाची खूप कठीण साधना केली. खरेतर कबीर साहेब संसार मंडळावर आलेले पहिले असे संत होते, जे कधीही मनुष्य योनीपेक्षा खालच्या दर्जाच्या योनीत गेले नाहीत.

राधास्वामी मताचे शेठ शिवदयाल सिंह स्वामीजी महाराजांनी आपल्या लहान वयातच सतरा वर्षे एका अंधाऱ्या खोलीत ध्यान-अभ्यास केला. त्याचप्रमाणे बाबा जयमल सिंहजींनी खूप कष्टदायक तपश्चर्या केली. महाराज सावन सिंहजींनीदेखील अत्यंत कठीण नाम-साधना केली, ते कित्येक दिवस खोलीतून बाहेरच निघत नसत. तसेच महाराज कृपाल सिंहजींनी देखील शब्दनामाची कठोर तपश्चर्या केली. मस्तानाजी जे महाराज कृपाल सिंहजींच्या कार्यकाळात विद्यमान होते व जे गुरूभक्ती करीत असताना महाराज कृपालजींसोबत राहीले होते, ते नेहमी म्हणत असत,''कृपाल सिंह नामाची कमाई केलेले संत आहेत, ज्यांना नामाची कमाई केलेले संत पहायचे असतील त्यांनी दिल्लीत जाऊन कृपाल सिंहांना भेटावे.''

मी माझ्या जीवनाचा दीर्घकाळ जमीनीखालील गुहेत व्यतीत केलेला आहे. मला जाणीव आहे की ध्यान-अभ्यास करणे किती कठीण आहे, अशा वेळी आपले मन कसे दुराग्रही बनून ताठ उभे रहाते. ध्यान-अभ्यासाची

साधना करू इच्छित व्यक्तीचे हृदय पोलादी असणे गरजेचे आहे. गुरू नानकदेवजींना त्यांच्या आईने विचारले,''मुला, परमेश्वराच्या नामाचा जप करणे किती सोपे आहे?'' तेव्हा गुरू नानकदेवजी म्हणाले:

आखड़ औखा सच्चा नाम।

आई, खऱ्या शब्द–नामाची कमाई करणे अवघड असते. कधी काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार व्यत्यय आणतात, तर कधी लोकलाज थांबविते तर कधी आळस येतो. या गोष्टींना दूर करूनच आपण नामाची कमाई करू शकतो. महात्मा आपणांस सांगतात की या गोष्टींचा सामना खूप कठीण असतो. मन खूप हट्टी असते परंतु सेवकाच्या पाठीवर परिपूर्ण सतगुरूंचा हात असतो, ते त्याची मदत करतात. गुरू नानकदेवजी सांगतात:

नेह ते पंज जवान, गुरु थापी दित्ती कंड जिओ।

ज्याप्रमाणे पैलवान आखाड्यात उतरतात, आखाड्यात गुरू उभे असतात, ते शिष्याच्या पाठीवर थापटत म्हणतात,''मुला तू ससाण्यासमान आहेस व या गोष्टी तुझ्यासमोर चिमणीसारख्या आहेत.'' तिसरा तिळ हा आपला आखाडा आहे. काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच डाकूंची स्थूल गाठ आपल्या नेत्रांमागे आहे, आपले सतगुरू देखील याच जागी बसलेले आहेत. जेव्हा शिष्य नामस्मरणाद्वारे आपले लक्ष एकाग्र करून तिसऱ्या तिळावर पोहचतो, तेव्हा गुरूदेखील शिष्याची पाठ थोपटत त्याच्या पाठीशी उभे असतात. मग भले ते पाच डाकू असले आणि त्यांच्याविरूद्ध शिष्य एकटाच जरी असला तरी गुरूंच्या थापटीने ते शक्य होते. तुम्ही तसे करून पहा, गुरू श्वासा–श्वासाला शिष्याचा सांभाळ करतात.

सांसारिक व्यक्तींसाठी काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार हे पाचही शक्तीशाली वाघासारखे जरी असले तरी परमेश्वराच्या भक्तांपुढे ते भित्र्या उंदराप्रमाणे आहेत. जसे मांजरीस पाहून उंदीर भेदरून जातो, त्याचप्रमाणे भक्तास पाहून हे पाचही भेदरून जातात. गुरू नानकदेवजी सांगतात:

जगत पास से लेते दान गोविंद भक्त को करे सलाम।

तिना पिछै छुटीऐ पिआरे जो साची सरणाइ।।

जीवात इतके आत्मबळ नसते की तो स्वत:हून सचखंडात पोहचून परमात्म्यास भेटू शकेल. ज्याप्रमाणे लहान मुल स्वत:हून शिकून बी.ए. वा एम.ए. ची पदवी प्राप्त करू शकत नाही, त्यास शिक्षकाची सोबत करावी लागते व त्याची मदतही घ्यावी लागते. याचप्रमाणे संत–महात्मा सचखंडातून आपणांस नेण्यासाठी येतात. जे लोकलाज सोडून त्यांच्या शरणी येतात, संतांच्या पाठोपाठ जाऊन त्यांचीदेखील सुटका होते.

मिठा करि कै खाइआ पिआरे तिनि तनि कीता रोगु।।
कउड़ा होइ पतिसटिआ पिआरे तिस ते उपजिआ सोगु।।

ज्या गोष्टींमध्ये आपण गुरफटलेलो आहोत त्यागोष्टींविषयी गुरू अर्जुन देवजी महाराज सांगतात,''आपण विषय–भोग, मद्य–मांसाच्या रसास गोड समजून खातो परंतु आपण जितके भोग भोगतो तितके आजार होऊन आपणांस त्याकर्मांची परतफेड करावी लागते. मग आपण रडतो, कण्हतो, तळमळतो. विषय–भोगांचा रस अगोदर मधुर लागतो, परंतु आपल्या जीवनकाळातच ते आपणांस फिके वाटू लागतात. नंतर या विषय–भोगांमधील स्वारस्य निघून जाते.'' गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

भोगों रोग सो अंत विगोऐ, सो आए जाए दुख पाऐंदा।

भोग भुंचाइ भुलाइअनु पिआरे उतरै नही विजोगु।।
जो गुर मेलि उधारिआ पिआरे तिन धुरे पइआ संजोगु।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात,''ज्यांना परिपूर्ण गुरू लाभतात, जे गुरूंकडून नामदान प्राप्त करतात, त्यांचा गुरूंशी संयोग ईश्वर दरबारी नमुद केलेला असतो. आपण स्वत:हून संगतमध्ये जाऊही शकत नाही आणि

नामही प्राप्त करू शकत नाही. सर्व धर्म परमात्म्याचा आणि नामाचा महिमा वर्णन करतात. आपणांस माहीत आहे की आपण परमात्म्याच्या नाम प्राप्तीच्या उद्देशाने देखील एकत्रित होऊ शकत नाही. निरनिराळे धर्म आणि संप्रदाय का निर्माण झाले? कारण आपण खऱ्या नामाशी जुडलेलो नाही. अल्लाह–अल्लाह, वाहेगुरू–वाहेगुरू, राम–राम हे खरे नाम नसून ते खऱ्या शब्द–नामाचा महिमा वर्णन करतात.

माइआ लालचि अटिआ पिआरे चिति न आवहि मूलि।।

आपण सांगता,''काळाने जीवाच्या अंतरात मायेचा इतका लोभ निर्माण केला की हा बिचारा जीव मायेच्या खालीच दबला गेला, तो आपले संपूर्ण आयुष्य माया गोळा करण्यातच व्यतीत करतो.''

जिन तू विसरहि पारब्रह्म सुआमी से तन होए धूड़ि।।
बिललाट करहि बहुतेरिआ पिआरे उतरै नाही सूलु।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात,''आपण शेळ्या–बकरे–गाईंचे गळे सुरीने कापतो. त्या बिचाऱ्या किंकाळतात–कळकळीची विनंती करतात. कोणी त्यांची किंकाळी वा कळकळीची विनंती ऐकतो का? कोणते असे कोर्ट आहे जिथे जाऊन ते आपली याचना नोंदवू शकतात?

कधी आपण असा विचार करून पाहिला आहे की आपल्या कर्मांपोटी जर का यांच्या हातात सुरी आली व आपला गळा त्या सुरी खाली असला तर आपणांस कसे वाटेल? कदाचित पूर्वजन्मी ही जनावरे आपल्याहूनही चांगले मनुष्य असावेत, शेठ–सावकार असावेत व आज त्यांच्या पूर्वकर्मांमुळे त्यांना जनावरे बनून स्वतःचे गळे कापून घेणे भाग पडले असेल? याविषयावर कबीर साहेब सांगतात:

बकरी पाती खात है ताकी काडी खाल।
जो बकरी को खात है तिनकी कौन हवाल।।

पल्टू साहेब सांगतात:

मुसलमान करें जिव्हा, हिन्दु मारे झटका।
खाए दोऊ मुरदार फिरत है दोऊ भटका।
वे पुरव वे पश्चिम ताकते अरे हां रे पल्टू।
मस्जिद में जाए दोऊ सिर मारते।।

गुरू नानक साहेब सांगतात:

पाप करे पंचा के वसरे, तीर्थ न्हाए कहे सब उतरे।

आपण पाप करून मंदीर, मशीद वा चर्चमध्ये जाऊन त्या पापांसाठी क्षमा मागू इच्छितो. गुरू अर्जुनदेवजी म्हणतात:

बहुर कमावे होय निसंग, जमपूर बाध खड़े कलंक।

महात्मा आपणांस सांगतात की,''जर कोणी याजगात एखाद्या व्यक्तीची हत्या करून चर्च वा गुरूद्वारात जाऊन आपल्या गुन्ह्यासाठी क्षमा मागत असेल तर त्यास कधीही क्षमा मिळत नाही. त्यावेळचे शासक त्यास जरूर दंड देतात. अशावेळी व्यायाधीश त्यास म्हणतो,''अरे बाबा, आता तू या गुन्ह्याचा दंड भोग, यापुढे असे करू नकोस.'' महात्मा आपणांस सांगतात की मांसाचा मोबदला मांस देऊनच करावा लागतो. आपण ज्याचे मांस खाल्ले तो आपले मांस जरूर खाईल.

महात्मा सदना कसाई होते, ते मांस विकत असत. एके दिवशी एका श्रीमंत माणसास मांस हवे होते. तो सदना कसायाकडे मांस घेण्यासाठी आला. त्यावेळी नुकताच दिवस मावळला होता. त्याकाळी आजच्यासारखी फ्रिजची सुविधा नव्हती की मांस कापून त्यात ठेवल्यास ते खराब होत नाही.

सदना कसायाने त्यास नकार दिला, परंतु तो त्याचा नेहमीचा गिऱ्हाईक होता. त्याने सदनाला म्हटले,''तू जर आज मला मांस दिले नाहीस तर यापुढे मी तुझ्याकडे मांस विकत घेण्यासाठी पुन्हा कधीच येणार नाही.'' शेवटी नाईलाजाने सदना कसायाने म्हटले,''मी या बकऱ्याचे गुप्त अंग कापून

तुला देतो.'' जेव्हा तो बकऱ्याचे गुप्त–अंग कापू लागला, तेव्हा तो बकरा खद–खदून हसू लागला. सदनाने बकऱ्यास विचारले की,''तू का हसतोस?'' बकरा म्हणाला,''पूर्वजन्मांमध्ये कित्येकदा तू मला मारलेस आणि कित्येकदा मी तुला मारले. परंतु आज तू माझ्यासोबत नवीन कर्मं बनवू लागलेला आहेस. तू पहा! आज मी चार प्रहर तडफडून मरेन, त्यानंतर तुलादेखील अशाच तऱ्हेने तडफडून मरावे लागेल.'' सदनाच्या जीवनचरित्रात नमूद केले आहे की त्याने कसायाचे काम सोडून दिले, परिपूर्ण संतांकडून नामदान प्राप्त केले आणि सदनाला परमगती प्राप्त झाली. गुरूग्रंथ साहेबमध्ये सदना कसायाची वाणी नमूद केलेली आहे.

कबीर साहेब सांगतात,''ही काळाची चलाखी आहे की एका धर्मास सांगितले की गाईचे मांस खाणे अनुचित आहे परंतु डुकराचे मांस खाणे योग्य आहे आणि दुसऱ्या धर्मास सांगितले की डुकराचे मांस खाणे अनुचित आहे परंतु गाईचे मांस खाणे उचित आहे.''

माँस माँस सब एक है मुर्गी हिरनी गाय।
आँग देख नर खात है बाधे जमपुर जाए।।

मांस एकाच पद्धतीने म्हणजे आई–वडिलांच्या संयोगाने निर्माण होते. ज्याने कोणत्याही जनावराचे मांस खाल्ले त्याने मनुष्याचे मांसदेखील खाल्ले, त्याने सर्व प्राण्यांचे मांस खाल्ले.

जे गुर मेलि सवारिआ पिआरे तिन का रहिआ मूलु।।

आपण सांगता,''ज्यांना गुरू लाभतात व गुरूंकडून नामदान घेऊन ते नामाशी जोडले जातात, त्यांचा आत्मा प्रफुल्लित होतो. ते परत आपल्या घरी सचखंडात जाऊन पोहचतात.''

साकत संगु न कीजई पिआरे जे का पारि वसाइ।।
जिसु मिलिऐ हरि विसरै पिआरे सो मुहि कालै उठि जाइ।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज आपणांस समजावतात, ''आपले मन स्वाद–प्रेमी आहे. त्याच्यावर संगत–सोबतीचा खूप लवकर परिणाम होतो. जर त्याने मद्य–मांस खाणाऱ्यांची संगत केली तर तो मद्य–मांसाचे सेवन करू लागेल. जर त्याने नाम जपणाऱ्यांची संगत केली तर त्यास नामाचा जप करण्याची सवय लागेल.'' कबीर साहेब सांगतात:

साकत संग न कीजिए दूरो जाई ऐ भाग।
वासन कारो परसिए तो कुछ लागे दाग।।

आपण साकत (मद्यमांसाचे सेवन करणाऱ्या निगुऱ्या) पुरूषांची संगत करू नये. साकत पुरूषांना परमात्म्याच्या मर्जीची जाणीव नसते. साकत मद्य–मांसाच्या सेवनात मशगुल असतात. त्यांना परमात्म्याचा विसर पडलेला असतो. आपणांसही साकत लोकांचा संग करून परमात्म्याचा विसर पडेल. साकत लोकांना जी शिक्षा भोगावी लागणार आहे त्या शिक्षेचे वाटेकरी आपणांस देखील व्हावे लागेल.

मनमुखि ढोई नह मिलै पिआरे दरगह मिलै सजाइ।।

आपण सांगता,''मनमुख व्यक्तीस परमात्मा आपल्या दरबारात उपस्थित राहू देत नाही. मनमुख व्यक्तीस धर्मराजासमोर गुन्हेगाराप्रमाणे उभे केले जाते आणि धर्मराज त्यास शिक्षा देतो.''

जो गुर मेलि सवारिआ पिआरे तिना पूरी पाइ।।
संजम सहस सिआणपा पिआरे इक न चली नालि।।

आपण सांगता,''आपण कितीही चतुर वा शहाणे असलो तरी आपले सर्वकाही येथेच राहून जाईल.''

जो बेमुख गोबिंद ते पिआरे तिन कुलि लागै गालि।।

आता गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात,''जे परमात्म्याची भक्ती करीत नाहीत, ज्यांच्या अंतरात परमात्म्यास भेटण्याची तळमळ नाही ते स्वत: तर कलंकित होतातच वरून आपल्या कुळासही कलंकित करतात.'' गुरू रामदासजी महाराज सांगतात:

जिन हर ह्रदय नाम न वसयो तिन मात कीजे हर वांझा।

होदी वसतु न जातीआ पिआरे कूड़ु न चली नालि।।

महात्मा सांगतात, परमात्मा आपल्या अंतर्यात आहे. परमात्माच आपणांस जीवन देत आहे. जेव्हा परमात्मा आपल्या शरीरातून निघून जाईल, तेव्हा आपण मातीचा एक ढिग बनू परंतु आपणांस ते पटत नाही. आपण रात्रंदिवस खोटे बोलत आहोत की परमात्मा आपल्या अंतर्यात नाही. खरेतर या गोष्टी आपल्या सोबत जाणार नाहीत, आपल्या सोबत परमात्मा जाईल.

महात्मा आपणांस सांगतात की परमात्मा एखाद्या पर्वतशिखरावर किंवा समुद्राच्या तळाशी किंवा सोन्याच्या मंदीरात बसलेला नाही, तो तर आपल्या शरीराच्या आत आहे. जर एखादे खऱ्यात खरे मंदिर, ठाकूरद्वार वा चर्च असेल तर ते आपले शरीर आहे.

सतिगुरु जिना मिलाइओनु पिआरे साचा नामु समालि।।
सतु संतोखु गिआनु धिआनु पिआरे जिस नो नदरि करे।।

ज्यांच्यावर परमात्मा कृपा करतो, त्यांचीच परिपूर्ण गुरूंशी भेट घडवून आणतो. गुरू त्यास नामाशी जोडतात. नामाची कमाई केल्याने आपल्या अंतरात सत्यता, संतोष, ज्ञान–ध्यान सर्वकाही येऊन स्थिर होतात.

अनदिनु कीरतनु गुण रवै पिआरे अंमृति पूर भरे ।।
दुख सागरो तिन लंघिआ पिआरे भवजलु पारि परे ।।
जिसु भावै तिसु मेलि लैहि पिआरे सेई सदा खरे ।।
संम्रथ पुरखु दरआल देउ पिआरे भगता तिस का ताणु ।।
तिसु सरणाई ढहि पए पिआरे जि अंतरजामी जाणु ।।
हलतु पलतु सवारिआ पिआरे मसतकि सचु नीसाणु ।।
सो प्रभु कदे न वीसरै पिआरे नानक सद कुरबाणु ।।

गुरू अर्जुनदेवजी महाराजांनी या छोट्याशा वाणीत संतमतास अत्यंत प्रेमाने समजावले की संतमत सर्व धर्मांचा आदर करते. संतमताचा उद्देश कोणत्याही धर्माचे उन्मूलन करण्याचा नसतो. ज्यांच्यावर परमात्मा कृपा करतो केवळ त्यांनाच खऱ्या शब्द–नामाची प्राप्ती होते. जेव्हा परमात्मा कृपा करतो तेव्हा तो त्यांस सतगुरूंच्या संगतीत आणतो.

शेवटी आपण हिच विनंती करता की,''हे परमात्मा, तू आमच्यावर दया कर आणि आमची सतगुरूंशी भेट घडवून आण तसेच आम्हांस नामदानाची देणगी दे, जेणेकरून आम्हीदेखील खोट्याचे खरे बनून तुझ्या दरबारात हजर होऊन पूर्णत्वास पोहचू.''

सतसंग समाप्त झालेला आहे. मी येथे येऊन खूप प्रसन्न झालो. येथील प्रेमींनी खूप धाडस दाखविले, आपल्या सतगुरूंचा आधार घेऊन जंगलातदेखील मंगलमय कार्यक्रम आयोजित केला. ज्या प्रेमींनी कार्यक्रमाच्या व्यवस्थापनात यांना साथ देऊन सेवेत सहयोग दिला, त्यांचादेखील मी आभारी आहे.

***



प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान

एक प्रेमी : काय सर्व आत्मे एकसमान आहेत? सर्वांची उत्पत्ती एकाच पद्धतीने झालेली आहे की सर्व आत्मे निरनिराळ्या पद्धतीचे आहेत? जसे काळाचे अस्तित्व निराळे आहे, तसेच आत्मे वेगवेगळ्या प्रकारचे आहेत की ते एकाच प्रकारचे आहेत?

बाबाजी : सर्व आत्मे हे परमात्म्याचे अंश आहेत. सर्व आत्म्यांचे मूळ स्थान सचखंड आहे. परंतु हे सर्व आत्मे परमात्म्यापासून दुरावून या मायाजालात अडकलेले आहेत.

एक प्रेमी : महाराजजी! सत्कर्मांमुळेच मनुष्य उच्च मंडळांमध्ये जाऊ शकतो की या जगातील सर्व बंधनांमधून मुक्त होणे पुरेसे आहे?

बाबाजी : कर्मांमुळे आपणांस मुक्ती मिळू शकत नाही, मग भलेही ती कर्मं चांगली असोत वा वाईट! तुम्ही जर सत्कर्मे केलीत, तर पुढील जन्मात तुम्ही शेठ–सावकार बनून जन्मास याल किंवा जगावर सत्ता गाजविण्यासाठी नेता बनून जन्म घ्याल. झोपडीतील निवासस्थानातून निघून आपण राजवाड्यात राहू लागू. हातामधील झाडू जाऊन तुमच्या हाती सत्ता येईल. आपली कर्मं जर वाईट असतील तर आपल्यासाठी नरक आणि चौऱ्याऐंशी लक्ष योनींचा चक्रनेमीक्रम तयारच असेल. त्यामुळे सत्कर्मे वा दुष्कर्मे आपणांस मुक्ती मिळवून देऊ शकत नाहीत.

एक प्रेमी : आपल्या सर्वांचे आत्मे सचखंडापासून का दुरावले गेले?

बाबाजी : खरेतर तुम्ही ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जाऊन हे सर्व जाणून घेणेच चांगले आहे. स्वामीजी महाराजांनी हा गुंतावळा अतिशय प्रेमाने सोडवित आपणांस समजावले आहे. परमात्मा आत्म्यास सांगतो की,

मी मुद्दाम जाणूनबुजून काळाची रचना केलेली आहे. मी जर आत्म्याची रचना केली नसती, तर आत्मे माझ्या ताब्यात राहिले नसते. काळाच्या देशात येऊन दु:खी झाल्यानेच आत्म्यांनी सत्पुरुषाला विनंतीपूर्वक हाक दिली. त्यानंतर मनुष्य शरीर धारण करून सत्पुरुषाने आत्म्यांना उपदेश केला. त्यावेळी आत्म्यांनी सत्पुरुषास विचारले की तू पुन्हा आम्हाला काळाच्या ताब्यात देणार नाहीस याची काय खात्री? त्यावर सत्पुरुषाने आत्म्यांना वचन दिले की, माझ्या मर्जीनुसार या एकावेळी मी तुम्हाला काळाच्या ताब्यात जरूर सोपविले आहे, परंतु जे आत्मा यापुढे माझ्यासोबत सचखंडास येतील, त्यांना पुन्हा मी काळाच्या देशात पाठविणार नाही.

याबद्दल सर्वकाही अनुराग सागर या पुस्तकामध्ये छापलेले आहे. मी प्रेमपूर्वक तुम्हाला सल्ला देतो की तुम्ही अनुराग सागर ग्रंथ वाचा. अनुराग सागर ग्रंथात कबीर साहेबांनी काळ आणि दयाल यांच्याबद्दल अतिशय विस्तारपूर्वक लिहिले आहे, त्यामुळे आंतरिक मंडळांचे सखोल ज्ञान मिळते. मी अपेक्षा करतो की ज्या प्रेमींना इंग्रजीचे ज्ञान आहे त्यांनी सत्संग करताना अनुराग सागर ग्रंथातील जमेल तेवढी माहिती प्रेमींना वाचून सांगावी.

एक प्रेमी : एखाद्या मनुष्याचे त्याच्या सर्व कर्मांचे फलित भोगून झाल्यावर त्याचा मृत्यू होतो का?

बाबाजी : आपली तीन प्रकारची कर्मं असतात – प्रारब्ध, संचित आणि क्रियमान. जी कर्मं आपण आज भोगत आहोत, तसेच ज्या कर्मांचे फळ म्हणून आपल्या आत्म्यास हे शरीर लाभले आहे, ती कर्मं म्हणजे प्रारब्ध कर्मं. परमात्म्यापासून दुरावल्यानंतर जी काही कर्मं आपण करीत आलेलो आहोत, प्रत्येक जन्मात आपण कर्मांचे गाठोडे बांधले, त्यापैकी बऱ्याच कर्मांची फळे भोगण्याचे आपले बाकी आहे. त्या कर्मांना संचित कर्मं म्हणतात. या संचित कर्मांचा स्टॉक ब्रह्मस्थानात जमा होत असतो. जी कर्मं आपण आता करीत आहोत, त्यांना क्रियमान कर्मं म्हणतात. एखाद्या

जन्मात जरी सर्व कर्मं आपण भोगली तरी काळ ब्रह्मस्थानात जमा असलेल्या आपल्या संचित कर्मांच्या स्टॉकमधील कर्मं घेऊन त्यानुसार पुन्हा जन्म देतो. शब्द–नामाची कमाई केल्याशिवाय कर्मांचा हिशोब संपत नाही.

हे तुम्ही उदाहरणार्थ समजून घेऊ शकता की जसे एखाद्या शेतकऱ्याने शेतात बी पेरल्यानंतर शेत पिकून त्याच्या घरी ते धान्य सहा महिन्यानंतर येते. त्यानंतर पुन्हा तो पेरणी करतो, जे पीक पिकून त्याचे धान्य त्याच्या सहा महिन्यांनी त्याच्या घरी येते. या दर सहा महिन्यांनी येणाऱ्या धान्यामधून काही धान्य तो शेतकरी बचत म्हणून बाजूला ठेवतो व विकून आलेले पैसे बँकेत जमा होतात. कित्येकदा शेती करताना पीकाचे नुकसान होते, त्यावेळी त्याच्या घरी जो धान्याचा स्टॉक असतो किंवा पूर्वी धान्य विकून बँकेत जमा केलेले पैसे असतात, त्यातून तो आपला खर्च चालवतो.

याचप्रमाणे एखाद्या जन्मामध्ये आपली प्रारब्ध कर्मं जरी संपली, तरी काळ आपल्या गत जन्मांमधील संचित कर्मांचा खजिना ब्रह्मस्थानातून घेऊन आपणांस पुन्हा नवीन जन्म देतो. या जगात येणाऱ्या अवतारांचाही ब्रह्मस्थानात जमा असलेला संचित कर्मांचा स्टॉक कधीच संपत नाही. नाहीतर त्यांना पुन्हा या जगामध्ये का बरे यावे लागले असते? कर्मांचा गुंता अतिशय जटिल आहे, ती कर्मं प्रत्येकास भोगावीच लागतात. नाम ही एकच अशी शक्ती आहे जी आपल्या सर्व कर्मांचा हिशोब समाप्त करून टाकते.

सतगुरु जेव्हा आपणांस नामदान देतात, तेव्हा ते आपल्या प्रारब्ध कर्मांमध्ये काही फेरफार करीत नाहीत. नामदान देताना तसेच नंतर सत्संगाद्वारे ते आपणांस क्रियमान कर्मांबद्दल समजावतात की, आता यापुढे आपण वाईट कर्मं करू नये. नामदान देते वेळी ते त्यांच्या कृपादृष्टीने आपल्या संचित कर्मांचा साठा संपवून टाकतात. ती कर्मं सेवकास भोगावी लागत नाहीत. आपण आपली प्रारब्ध कर्मं भोगत असतानाही सतगुरु आपली मदत करतात. स्वामीजी महाराज सांगतात :

सतगुरु शरण गहो मेरे प्यारे कर्म जुगात चुकाई।

तुम्हांस जर तुमच्या संचित कर्मांचा साठा नष्ट करायचा असेल, तर सर्वप्रथम तुम्ही सतगुरुंना शरण जा. आपली ती कर्मं सतगुरु माफ करवू शकतात, कारण या जगात ते कृपाच घेऊन येतात.

एक प्रेमी : आत्मा कोणत्या क्षणी शरीरात प्रवेश करतो, मुलाच्या जन्माच्या वेळी की जेव्हा मुलाचा आईच्या पोटात प्रादुर्भाव होतो?

बाबाजी : मी तुम्हांस हा मुद्दा थोडक्यात समजावतो. जेव्हा शरीराची रचना बनण्यास सुरुवात होते त्यावेळी आत्मा शरीरात दाखल होतो. मुल जन्मते वेळी जर आत्मा त्याच्या शरीरात प्रवेश करीत असता तर आईच्या पोटात असताना मुलाने हालचाल केली नसती. अनुभव दर्शवितो की मुल आईच्या पोटात अगोदरपासूनच हालचाल करीत असते. अनेकदा महिने पूर्ण होण्याआधीच काही कारणास्तोवर मुलाचा आईच्या पोटातच मृत्यु होतो, ते अजीव होते व काही हालचाल करीत नाही.

एक प्रेमी : एक मनुष्य जो नामधारी असतो त्याची स्वेच्छा (स्वत:ची इच्छा) आणि बिना नामधारी व्यक्तीची स्वेच्छा यामध्ये काय फरक असतो?

बाबाजी : नामधारी सत्संगी प्रेमीने स्वेच्छाचार (स्वत:च्या इच्छेनुसार आचरण) सोडून द्यावे. त्याचे आचरण सदैव सतगुरूंच्या इच्छेला अनुसरून असावे. बिन–सतसंगी व्यक्तीस नामदान प्राप्त झालेले नसल्याने, तो नेहमीच स्वेच्छाचार करतो. ते दोघेही जर स्वेच्छाचार करीत असतील तर सतसंगी आणि बिन–सतसंगी या दोघांमध्ये काहीच फरक राहणार नाही.

तुम्हा सर्वांना कल्पना आहे की, मी जेव्हा विश्वयात्रेसाठी गेलो होतो, तेव्हा ज्या–ज्या देशात मी गेलो तेथे हेच सांगितले की, माझे वैयक्तिक असे कोणतेही मिशन नाही वा माझी स्वत:ची अशी कोणतीही इच्छा नाही. मी माझ्या सत्गुरूंच्या इच्छेनुसार तुमची सेवा करण्यासाठी येथे आलेलो आहे. मी माझ्या गुरूदेवांचा संदेश आपल्यापर्यंत पोहचविण्यासाठी आलेलो आहे.



प्रेमी स्वत:स नामधारी तेव्हा म्हणवू शकतो, जेव्हा तो स्वेच्छाचार त्यागून सतगुरूंच्या इच्छेला अनुसरून वाटचाल करू लागतो.

एक प्रेमी : तुम्ही एखाद्या संतांबरोबरच्या खाजगी मुलाखतीबद्दल आम्हांस काही सांगू शकाल का?

बाबाजी : तुम्ही जेव्हा एखाद्या संतांकडे खाजगी मुलाखतीसाठी जाता तेव्हा तुम्ही काहीही विचार करण्याची गरज नसते, कारण तो महान आत्मा तुमच्या अंत:करणातील प्रत्येक गोष्ट जाणत असतो. काही महिन्यांपूर्वी एक पश्चिमी प्रेमी माझ्या भेटीसाठी आला असता, त्याने सुमारे अर्धा तास भाषण दिले. मी ते अतिशय शांतपणे ऐकत राहिलो. त्याने मला बोलण्याची संधीच दिली नाही. अखेरीस तोच म्हणाला की मी गरजेपेक्षा जास्त बोलत राहिलो.

आपण एखाद्या महान आत्म्याकडे आपली एखादी अडचण सोडविण्याच्या हेतूने त्यांचा सल्ला घेण्यासाठी जातो, कारण त्यांचा सल्ला हा परमात्म्याचा सल्ला असतो. ते जो काही आपणांस योग्य सल्ला देतात, तो आपल्या हिताचाच असतो. तुम्ही मुलाखतींच्या वेळी येऊन पाहू शकता की, प्रेमी

सोबत मोठमोठ्या चिठ्ठ्या लिहून आणतात, ज्यामध्ये त्यांचे प्रश्न असतातच, सोबत त्या प्रश्नांची उत्तरेही लिहिलेली असतात. त्यामुळे मला उत्तर देण्याची संधीच मिळत नाही. मी गपचूप बसून असतो. अनेकदा माझ्या हृदयात दया येते की, माझ्याजवळ हा स्वत:चा फायदा करून घेण्यासाठी आला होता, परंतु प्रश्न विचारून स्वत:च त्यांची उत्तरे देत राहिला. मग मला त्याने ते सर्व काही ऐकवण्याची गरजच काय होती?

ज्या गोष्टीचे आपणांस ज्ञान नाही अशाच गोष्टींबद्दल आपण मुलाखतीच्या वेळी विचारावे, जेणेकरून त्यांना आपणांस प्रेमाने समजावून सांगता यावे. मुलाखतीबाबतीत मी तुम्हाला प्रेमाने सल्ला देतो की संत–सतगुरूंकडे जाण्यापूर्वी तुम्ही विचारणार असलेल्या प्रश्नाबद्दल विचार करा. जर त्या प्रश्नाचे उत्तर तुम्हांस ठाऊक असेल तर तो प्रश्न का विचारावा? ज्याबद्दल तुम्हांला ज्ञान नाही, त्याबद्दलच प्रश्न विचारा, ते तुम्हास व्यवस्थित समजावून सांगतील.

अनेक प्रेमींची अशी धारणा असते की, त्यांनी जर जास्त प्रश्न विचारले नाहीत, तर त्यांना मुलाखतीस कमी वेळ मिळेल, परंतु ज्यांच्याकडे विचारण्यासाठी काही प्रश्नच नसतात, त्यांनाही मी पुरेसा वेळ देतो. तुम्हांला जर एखादी कौटुंबिक अडचण असेल, तुम्हाला ध्यान–नामस्मरणाच्या प्रगतीबद्दल वा अडचणींबद्दल काही विचारावयाचे असेल, तर खाजगी मुलाखतीच्या वेळी तुम्ही नि:संकोचपणे त्याविषयी विचारू शकता.

संतांकडे आत्मिक आणि शारीरिक ज्ञान सखोल असते. शरीरात किती नाड्या आहेत व त्यांचे कोणकोणते कार्य असते याचे ज्ञान त्यांना असते. पुरुषांच्या तसेच स्त्रियांच्या शरीरात किती कप्पे आहेत? आपण पित असलेले पाणी कोणत्या बाजूस जाते व खात असलेले अन्न कोणत्या बाजूस जाते? या सर्वांचे त्यांना सखोल ज्ञान असते. त्यांना प्रश्न विचारण्यापूर्वी तुम्ही लक्षात ठेवा की ते सर्वज्ञानी आहेत.

***

अमृतवेळ

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान-अभ्यासाच्या कार्यक्रमाप्रारंभी संगतला दिलेला संदेश, संतबाणी आश्रम, राजस्थान - १ सप्टेंबर १९८५

मी तुम्हाला दररोज सांगत असतो की, आपण जरी एखाद्या संसारिक मनुष्याचे वा कुटुंबाचे काम प्रेमपूर्वक केल्यास ते देखील खूष होतात. ज्या कुटुंबातील वा समाजातील आपापसामधील प्रेम नाहीसे होते व त्या प्रेमाच्या जागी क्रोध मुक्काम ठोकतो, ते कुटुंब व तो समाज अशांत होऊन त्याची परिणीती दु:खाच्या नगरामध्ये होते. एखाद्या कुटुंबास जर त्यांचे घर स्वर्गासमान बनवायचे असेल, तर त्यासाठी त्यांनी प्रेमाचा आधार घ्यावा.

प्रेम ही अशी विलक्षण वस्तू आहे की, ज्या कुटुंबामध्ये वा समाजामध्ये ते वास्तव्य करू लागते, तेव्हा ते कुटुंब वा समाज शांत होतोच, सोबत त्यांच्या आजुबाजूचे वातावरणही प्रेममय बनते. मग आपण प्रेमाचा अंगिकार का करू नये? प्रेमामुळे जर आपला इतका सांसारिक फायदा होत असेल, तर मग आपण प्रेमाने आणि श्रद्धेने आपला ध्यान-अभ्यास का करू नये?

परमात्मा सदैव कृपावंत असतो, मग तो आपल्यावरच प्रसन्न का नाही होणार? तो नक्कीच प्रसन्न होईल. आपण आपल्या मनास शांत केले, तरच आपल्या अंतरात प्रेमाची उत्पत्ती होईल. मनास शांत करण्याचा अर्थ आपल्या मनात दररोज जे संकल्प-विकल्प निर्माण होत आहेत, ते आपणांस बेचैन करीत आहेत. ज्याप्रमाणे एखाद्या मनुष्यास विंचवाने दंश केल्यावर तो मनुष्य बेशुद्ध पडतो, त्याप्रकारचे काम हे संकल्प-विकल्प करीत आहेत.

मी अतिशय क्रोधायमान होणाऱ्या अनेक लोकांना भेटलेलो आहे. ते क्रोधाच्या आवेगात बोलत असताना, त्यांच्या हे देखील लक्षात येत नाही की, ते काय बोलत आहेत? परंतु मन शांत झाल्यावर तेच म्हणतात, ''जसे तुम्ही म्हणाल, तसे करावयास मी तयार आहे. मी तर काहीच म्हटले

नव्हते.'' आता तुम्हीच सांगा, अशी कोणती गोष्ट आहे की, जी आपणांस असे पाषाण हृदयी बनविते?

सेवादार हरबंस सिंह तुमच्या सोबतच राहतो. त्याचे वडील मला त्यांचा एक स्वानुभव सांगत असताना तो माझ्या शेजारीच बसलेला होता. त्याचे वडील सांगत होते,''मला क्रोधाचा आवेग आल्यावर मी आठ प्रहर बेशुद्ध होतो. त्यावेळी मला हेदेखील कळत नाही की, कोण आपला आणि कोण परका आहे?'' जर क्रोधाच्या आहारी गेलेल्या मनुष्याची आठ-आठ तास शुद्ध हरपते व त्यास आपल्या आणि परक्या मनुष्यामधील फरकही जाणवत नाही तर मग अशा दुर्गुणापासून आपण दूर राहावयास हवे.

सकल विश्वाचे मालक, परमात्मा सावन-कृपाल यांनी आपल्यावर अपार कृपा करून आपणांस ध्यान-अभ्यासासाठी हा एक तास दिलेला आहे. आजच्या या युगामध्ये प्रत्येकजण आपापल्या अडचणींमध्ये गुरफटून गेलेला आहे. कुणी धन-संपत्तीसाठी, कुणी मुलाबाळांमुळे, कुणी मानपानामुळे तर कुणी उच्चपदासाठी दुःखी झालेला आहे. ज्याचे मन शांत आहे व जो परमात्म्याशी एकरंग झालेला आहे, तोच मनुष्य सुखी आहे. बाकी आपण सर्वजण दुःखी आहोत. अशा परिस्थितीत अग्नीत होरपळत असलेल्या या जगात आपणांस नामाची भक्ती करण्याची संधी देणाऱ्या दयाळू गुरूंचे आपण आभार मानावयास हवे. या संधीचा पुरेपूर फायदा करून घेणे हे आपले कर्तव्यच आहे. अंतर्यात जाऊनच आपण गुरूंचे खरे आभार मानू शकतो.

सतगुरूंनी आपल्यावर एवढी अपरंपार कृपा केलेली आहे की, जोपर्यंत आपण अंतर्यात जात नाही, तोपर्यंत आपणांस कल्पनाच येत नाही की आपल्यावर ते किती दया करीत आहेत? आपल्या किती कर्मांची परतफेड होत आहे? आपल्या आत्म्याची किती स्वच्छता होत आहे? म्हणूनच आपण आपल्या मनास शांत करणे गरजेचे आहे. मी नेहमी सांगतो की, संत-महात्मे आपल्यासमोर या जगाचे असली स्वरूप मांडतात. परंतु तसे

करण्यामागे कुणाला हिणवण्याचा त्यांचा हेतु नसतो. ते पहातात की हे जग काम, क्रोध लोभ मोह व अहंकार अशा पाच दरोडेखोरांद्वारे दु:खी व अस्वस्थ होत आहे, हे पाच दरोडेखोर मनुष्याची अध्यात्मिक जमापुंजी लुटत आहेत. संतांच्या अंत:करणात दयाभाव असतो, त्यामुळे ते शिष्यांचे हित चिंतीतात की कसेही करून शिष्य सुधारावेत व ते स्वगृही सहजतेने परतावेत.

या पाचांपैकी कोणती ना कोणती शक्ती काळ आपल्यामागे लावतो. कुणाच्या मागे काम, कुणाच्या मागे क्रोध, कुणाच्या मागे लोभ, कुणाच्या मागे मोह तर कुणाच्या मागे अहंकाररूपी दरोडेखोर लावतो. जगास बेचैन झालेले पाहून संत आपणांस समजावतात की, आपले किती भारी अध्यात्मिक नुकसान होत आहे? आपण कसे लुटले जात आहोत? अंतरामध्ये शब्द नामाशी एकरूप झाल्यास तुम्हांला शांती लाभेल. दररोज ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जाऊन आपली पारमार्थिक प्रगती होईल, तसेच या पाच दरोडेखोरांच्या विषाचा आपल्यावरील प्रभाव देखील कमी होऊ लागेल. स्वामीजी महाराज सांगतात :

डंक सहत फिर फिर पछतात, जहर हलाहल नित ही खावे।

आपण ध्यान–अभ्यास करतो, परंतु सोबत संतांनी सांगितलेली पथ्ये आपण पाळत नाही. क्षणोक्षणी विष प्राशन करतो आणि मग पस्तावतो.

आपले गुरूदेव परमपिता कृपालजींनी आपणांस रोजनिशी लिहिण्यासाठी प्रेरित केले. आपण दररोज रोजनिशी लिहावी यावर ते खूप भर देत असत, कारण ती आपल्या दररोजच्या कार्याच्या जमाखर्चाची नोंद असते. सैन्यामध्ये दररोज सर्वांची रोजनिशी लिहिली जाते. सैनिकाने केलेली चूक वा चांगल्या कामाची नोंद त्याच्या शीट रोलवर नमूद केली जाते. वरिष्ठ अधिकाऱ्याने सैनिकास बक्षिस देताना त्याची शीटरोल तपासली जाते. त्याने केलेल्या चुकीची नोंद लाल रंगाच्या शाईने केली जाते. त्यामुळे लाल शाईने केलेली नोंद अधिकारी काळजीपूर्वक वाचतो की याने काय चूक केलेली आहे?

मी नेहमी सांगत असतो की, जर आपण स्वत:च आपली शीटरोल खराब करून ठेवलेली असेल तर वरिष्ठ अधिकारी आपणांस बक्षीस कसे देईल? आपण आपली संधी गमावलेली असते. वरिष्ठ अधिकारी खेदाने आपणांस सांगतो की, तू चूक केली नसतीस, तर आज तुला मी नक्कीच बक्षिस दिले असते. याचप्रमाणे आपल्या रोज-रोजच्या चुकांची नोंदणी रोजनिशीमध्ये करून स्वत:चा सुधार करू शकतो.

महाराजजी सांगत असत की, तुम्ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत केलेल्या चुका, उदाहरणार्थ कुणाबद्दल वाईट विचार केला, पैशांच्या मदतीने एखाद्याचा सूड घेण्याचा विचार केला, लोकांची किती निंदा-नालस्ती केली तसेच दिवसभरात किती ध्यान-अभ्यास केला त्याची आपल्या रोजनिशीमध्ये रोज सायंकाळी मनाची तमा न बाळगता नोंद करा.

पश्चिमेकडील एका प्रेमीने मला प्रश्न विचारला की, महाराज कृपालजींनी सर्वांना रोजनिशी लिहिण्यासाठी सांगितली होती. तुम्ही त्या रोजनिशीबद्दल थोडे मार्गदर्शन करावे. मी अतिशय प्रेमाने त्यास समजावले की, महाराज कृपालजींनी अतिशय कृपा करीत आपणांस आपल्या आयुष्याचा सत्कर्म व दुष्कर्मांचा जमाखर्च लिहिण्यास सांगितला आहे, जेणेकरून आपल्यामध्ये सुधार व्हावा, आपणांस आपले होणाऱ्या नुकसानीचे ज्ञान व्हावे. या संदर्भात मी असे सांगेन की, आपल्या हातून आज झालेल्या चुकीची पुनरावृत्ती उद्या पुन्हा होऊ नये. रोजनिशी घेतली आणि त्यामध्ये केवळ नोंद केली असे होऊ नये. जास्त करून माझ्याकडे प्रेमींच्या अशा डायऱ्या येतात ज्यांमध्ये महिनाभर त्याच-त्याच केलेल्या चुकांची नोंद केलेली असते. डायरी लिहिण्याचा महाराजजींचा आदेश आपण पाळला पाहिजेच, परंतु त्या चुकांचा त्यागही केला पाहिजे, त्यांचा केवळ विचारच करीत राहू नये.

गुरु गोविंद सिंहजी महाराज रोपड विभागातील रूपनगर येथे गेले. त्या गावास चोरांचे गाव असे संबोधले जाई. एखाद्या प्रांतात ज्या प्रकारची माणसे

जास्त असतात, त्याला अनुसरून त्या प्रांतास संबोधले जाते. तेथे गुरु गोविंद सिंहजींनी सत्संग केला की चोरांची कोणी हमी भरत (बाजू घेत) नाही, चोरांचे कधी भले होऊ शकत नाही. त्या लोकांनी महाराजजींची विनवणी केली की आम्ही बरीच वाईट कामे करतो. त्यावर गुरू साहेबांनी त्यांना सांगितले की, तुम्ही करीत असलेल्या वाईट कामांची यादी बनवा.

त्या काळी शिक्षणास विशेष महत्त्व दिले जात नसे, जसे शिक्षणामध्ये आमचे राजस्थानदेखील खूप मागासलेले आहे म्हणून आम्ही येथे डायरी लिहिण्याचा प्रचार करीत नाही. जुन्या काळातील अशी अनेक वृद्ध मंडळी मी पाहिलेली आहे, जी डायरी घरी नेऊन तिच्याभोवती नित्यनेमाने धूप-दीपारती ओवाळत असत. महिन्या-दोन महिन्यांनी ती डायरी परत आणून मला सांगत की, हिला आम्ही नित्यनेमाने धूप दिला, तिच्यासमोर तुपाचा दिवाही प्रज्वलित केला. ते लोक जर सुशिक्षित असते तर त्यांनी डायरी भरून तिचा उपयोगही करून घेतला असता.

त्या चोरांच्या गांवातील लोक म्हणाले की, महाराजजी! आम्ही अशिक्षित आहोत. संतांची समजावण्यासाठी आपापली पद्धत असते. गुरू गोविंद सिंहजी महाराज म्हणाले की, तुमच्याकडून एखादी चूक झाल्यास तुम्ही एक दगड उचलून बाजूस ठेवा. त्या लोकांनी मान्य केले. त्यानुसार सर्व गांवातील लोकांनी केले. त्यांनी प्रत्येक चुकीच्या कामानंतर एक दगड बाजूस ठेवण्यास सुरुवात केली. काही दिवसांतच दगडांचे ढिगच्या ढिग उभे राहिले.

ते पाहून गांवातील लोकांनी सभा घेतली. ते टोळी बनवून चोऱ्या करीत असत त्यामुळे त्या सर्वांस लगेच एकत्रित होणे कठीण नव्हते. त्यांनी विचार विनिमय केला की येथे मोठमोठे दगडांचे ढीग जमा झाले आहेत त्याचा परमात्म्यास हिशोब आपण कसा बरे देणार? त्यापेक्षा आपण चोरी करणेच सोडून द्यावे, म्हणजे ना आपल्याकडून वाईट कर्मं होतील आणि ना दगडांचे मोठ-मोठे ढीग जमा होतील.

गुरू गोविंद सिंहजी पुन्हा त्या गावात सत्संगासाठी गेले. सत्संग झाल्यावर त्यांनी लोकांना विचारले की, मी जे काही तुम्हांस करण्यासाठी सांगितले होते, ते तुमच्या लक्षात आले का? तुम्ही तुमच्या कर्मांचा हिशोब केला का? ते म्हणाले की, तुम्ही गेल्यानंतर आम्ही हिशोब ठेवला. काही वेळातच दगडांचे मोठे ढीग तयार झाले. ते पाहून आम्ही निर्णय घेतला की ना आपण चोरी आणि वाईट कामे करावी, ना एवढे मोठे ढीग तयार होतील. कारण तुम्ही सांगितले होते की, त्याचा परिणाम आपल्यालाच भोगावा लागेल.

महाराज कृपालजींनी आपल्यावर कृपा केली व आपणांस रोज डायरी लिहिण्यास सांगितले. स्वत:ची चूक मान्य करणारा मनुष्य भाग्यशाली असतो. चूक मान्य न करणारा स्वत:मध्ये सुधार कसा बरे घडवून आणू शकतो.

महाराज सावन सिंहजी स्वत:च्या जीवनातील एक अनुभव सांगत असत. नोकरी करीत असताना त्यांनी एका इंग्रजाकडून कामाचा ताबा घेतला. काम ताब्यात घेतल्यानंतर ते म्हणाले,''मी शाळेतून नवीनच कामावर रुजू झालेलो आहे. माझ्या हातून एखादी चूक झाल्यास तुम्ही मला सांगा. मी ती स्विकारेन.'' त्या इंग्रजाने म्हटले,''मी तर काम तुम्हांस सोपवून मोकळा झालेलो आहे. महाराजजी म्हणाले, ''मी एखादी वस्तु मागत नसून मी तर तुम्हांस विनंती करीत आहे की माझ्याकडून काही चुकले, तर तसे तुम्ही मला सांगा.'' तो इंग्रज म्हणाला,''हे तर माझ्यासाठी खूप मोठे बक्षिस आहे, जे कुणी आजपर्यंत माझ्याकडून मागितले नव्हते.''

मी कालही सांगितले होते की, संतांच्या हातून कधी चूक होत नाही. ते केवळ आपणांस समजावण्यासाठी असे करतात, जेणेकरून आपल्या लक्षात यावे की, संत सचखंडास पोहचूनही तसेच परमात्म्यास भेटूनही त्यांच्या अंतरात किती नम्रता आणि आर्जव असतो. आपणही त्यांचे अनुकरण करावे. महाराज सावन सिंहजी जेवढी नम्रतेची आणि आर्जवाची भावना ठेवत, तशी भावना राखण्याचा आपण कधी विचार केला?



तुम्ही सामान्य सत्संगीस विचारून पाहा! ते असेच म्हणतील की, आम्ही चूक केलेली नाही, आम्ही चुकूच शकत नाही. आपण चुका केल्या नाहीत तर परमात्मा आपल्यासाठी सचखंडाचे द्वार उघडेल, आपणांस छातीशी कवटाळेल, आतमध्ये बसण्यासाठी स्थान देईल. आपल्या चुकाच आपणांस परमात्म्यापासून दूर ठेवतात.

संत आपल्या अवस्थेचे हुबेहुब वर्णन करतात. तसे करण्यामागे त्यांचा हाच हेतु असतो की, या ना त्या प्रकारे जीवाने परमात्म्याची भक्ती करावी, स्वत:मध्ये सुधार घडवून आणावा. स्वत:मध्ये सुधार घडविण्याचा असा फायदा होतो की, आपण आपले जीवन चांगल्या रितीने व्यतीत करतो, सुखी होतो आणि आपल्या आजूबाजूच्या बंधू-भगिनीदेखील सुखाने राहतात. आपण जर ध्यान-अभ्यास केला नाही, स्वत:मध्ये सुधार घडविला नाही, तर आपण स्वत: दु:खी होऊ तसेच आजूबाजूस राहणारेही दु:खी होतील.

मी नेहमी सांगत असतो,''आपण राहत असलेल्या धरतीस अभिमान वाटला पाहिजे की, माझ्यावर एक सन्माननीय मनुष्य राहत आहे. आपण ध्यान–अभ्यास–नामस्मरण केले, मनास शांत केले, तरच तसा अभिमान धरतीस वाटेल.''

आपले गुरूदेव परमात्मा, आपणांस जेव्हा नाम देतात, तेव्हा ते शब्दरूपाने आपल्या अंतरात बसतात व तेथे आपली वाट पाहत राहतात. नाम देते वेळी संत अशी व्यवस्था करतात की, आपली प्रारब्ध कर्मं आपण भोगत असता आपण दररोज अंतर्यात प्रगतीही करत असतो.

आपणांस जर विश्वास आहे की, आपल्या अंतरामध्ये आपले प्रिय गुरू बसलेले आहेत, तर आपण आपले बाह्य जगावरून लक्ष दूर सारून आपल्या भटकणाऱ्या मनास अंतर्यात शब्दाशी जोडावे. ही आपली एका तासाची बैठक आहे. सर्वांनी अंत:करणापासून ध्यानास बसावे. जोपर्यंत येथून तुम्हांस आवाज दिला जात नाही, तोपर्यंत तुम्ही उठू नये. ज्या प्रेमींना नाम प्राप्त झालेले नाही, त्यांनीदेखील त्यांच्या दोन्ही नेत्रांच्या मधोमध लक्ष एकाग्र करीत स्मरण करावे, त्यांना प्रकाश नक्कीच दिसेल. हां बंधुंनो! आता मन शांत करून ध्यानाला बसा!

***

धन्य अजायब

संतबाणी आश्रम १६ पी. एस. राजस्थान येथे परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील सत्संगाचे कार्यक्रम

४, ५ व ६ ऑगस्ट २०१७

७ ते ११ सप्टेंबर २०१७

***